# महाराष्ट्र शासन

**फोन नं. ०२२-२२८३८८७५**

**<u>तात्काळ/समय मर्यादा</u>**

क्र. स्थासंक-२०१५/प्र.क्र. ८२/२०१५/नवि-३२
**नगर विकास विभाग,**
शासकीय कुटीर क्र. ६,
फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट,
मुंबई - २१
दि. १३ मे, २०१५

प्रति,

१. आयुक्त,
सर्व महानगरपालिका.

२. जिल्हाधिकारी,
ठाणे/पालघर/सोलापूर/कोल्हापूर/जळगांव/औरंगाबाद/नांदेड/परभणी/लातूर/अहमदनगर/चंद्रपूर/अमरावती/अकोला/सांगली/पुणे/नाशिक/धुळे/नागपूर

**विषय - महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियमात सुधाणा करण्याबाबतच्या अधिसूचनेस व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत.**

**संदर्भ — शासन निर्णय क्र. स्थासंक-२०१५/प्र.क्र. ८२/२०१५/नवि-३२, दि. १२ मे, २०१५.**

महोदय,

महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियमात सुधारणा करण्याबाबतच्या प्रारुप अधिसूचना क्रमांक — स्थासंक-२०१५/प्र.क्र. ८२/२०१५/नवि-३२, दि. १२ मे, २०१५ च्या अधिसूचनेची प्रत शासन निर्णयाच्या प्रतीसह सोबत जोडलेली आहे. सदर अधिसूचनेस व्यापक स्वरुपात प्रसिद्धी द्यावी तसेच सदर अधिसूचना जास्त खप असलेल्या दोन प्रमुख वृत्त पत्रात प्रसिद्ध करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा, अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

(चं. वि. घायतडक)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**<u>महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर)</u>**
**<u>नियमात सुधारणा करण्याबाबत</u>.**

# महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : स्थांसक-२०१५/प्र.क्र. ८२/२०१५/नवि-३२**
**मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२**
**दि. १२ मे, २०१५**

**शासन निर्णय : -** सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण भाग एक — अ — मध्य उप —विभाग यामध्ये मराठी व नंतर इंग्रजी अशा रीतीने दि. १२ मे, २०१५ रोजी प्रसिद्ध करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

गो. आ. लोखंडे

**(गो. आ. लोखंडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४ त्यांना विनंती करण्यात येते की, शासन निर्णयाप्रमाणे अधिसूचना शासनाच्या असाधारण राजपत्रात भाग-एक-अ, उपविभागामध्ये प्रसिद्ध करुन त्याच्या प्रती खालील सर्व संबंधितांना पाठवाव्यात आणि १०० प्रती या विभागास पाठवाव्यात.

२) सर्व आयुक्त, महानगरपालिका (प्रत्येकी ५० प्रती)

३) निवड नस्ती नवि-३२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

12/5/15

O/C

प्रमुख मुद्रीतशोधक (अ)
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नीरोड, मुंबई ४०० ००४

# अधिसूचना

नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२
दि. १२ मे, २०१५.

महाराष्ट्र महानगरपालिका
अधिनियम

क्रमांक. स्थासंक-२०१५/प्र.क्र. ८२/नवि-३२, - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम १५२ न च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० यामध्ये आणखी सुधारणा करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन उक्त कलम १५२ न च्या पोट-कलम (२) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे यामुळे बाधित होण्याचा संभव असणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी खालील अधिसूचनेचा मसुदा प्रसिद्ध करीत असून याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासन सदर मसुदा **महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध** झाल्याच्या दिनांकापासून २० दिवसाचा कालावधी संपल्यानंतर विचारात घेईल.

२. उक्त मसुद्याबाबत वरील कालावधी समाप्तीच्या पूर्वी सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रायल, मुंबई - ४०० ०३२ यांना प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती व सूचनांवर शासनाकडून विचार करण्यात येईल.

## अधिसूचनेचा मसुदा

१. या नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१० च्या नियम, ४८ मधील पोट नियम ८ नंतर खालील पोट नियम समाविष्ट करण्यात येईल —

(९) (अ) — या नियमात काहीही अंतर्भूत असले तरीही राज्यशासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे स्थानिक संस्था कराचा भरणा करण्याकरीता अभय योजना घोषित करु शकेल.

**(ब)** – ज्यावेळी अशी योजना घोषित करण्यात आली असेल त्यावेळी स्थानिक संस्था कराचा भरणा करण्यास पात्र आहेत असे व्यापारी किंवा व्यक्ती त्या योजनेत विनिर्दीष्टीत केलेल्या कालावधीत स्थानिक संस्था कराचा भरणा महानगरपालिका आयुक्तांना करतील.

**क)** – असा कराचा भरणा केल्यानंतर असे व्यापारी किंवा व्यक्ती यांना देय असलेल्या स्थानिक संस्था कराच्या रक्कमेवर दंड किंवा व्याज देय असणार नाही आणि अशा व्यापारी किंवा व्यक्ती विरुद्ध कोणतीही कार्यवाही सुरु केली असल्यास ती थांबविण्यात येईल.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**गो. आ. लोखंडे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

s 2015

# NOTIFICATION

**Urban Development Department**
Hutatma Rajguru Chowk,
Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai – 400 032
Date - 12 May, 2015.

Maharashtra Municipal Corporation Act

No. LBT- 2015/CR-82/UD-32. – The following draft of rules further to amend the Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) Rules, 2010, which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 152T of the Maharashtra Municipal Corporation Act (LIX of 1949) and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (2) of the said section 152T of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after the expiry of a period of twenty days from the date of publication of this notification in the Maharashtra Government Gazette.

2. Any objection or suggestions which may be received by the Secretary (UD-2) Urban Development Department, Government of Maharashtra, Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya, Mumbai – 400 032, from any person with respect to the said draft, before the expiry of the above mentioned period will be considered by the Government.

## DRAFT RULES

1. These rules may be called the Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) (Amendment) Rules, 2015.

2. In rule 48 of the Maharashtra Municipal Corporations (local body tax) Rules, 2010, after sub-rule (8), the following sub-rule shall be added, namely :-

s 2015

**(ब)** – ज्यावेळी अशी योजना घोषित करण्यात आली असेल त्यावेळी स्थानिक संस्था कराचा भरणा करण्यास पात्र आहेत असे व्यापारी किंवा व्यक्ती त्या योजनेत विनिर्दीष्टीत केलेल्या कालावधींत स्थानिक संस्था कराचा भरणा महानगरपालिका आयुक्तांना करतील.

**क)** – असा कराचा भरणा केल्यानंतर असे व्यापारी किंवा व्यक्ती यांना देय असलेल्या स्थानिक संस्था कराच्या रक्कमेवर दंड किंवा व्याज देय असणार नाही आणि अशा व्यापारी किंवा व्यक्ती विरुद्ध कोणतीही कार्यवाही सुरु केली असल्यास ती थांबविण्यात येईल.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**गो. आ. लोखंडे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

s 2015